# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

बेटी बचाओ
save the girl child

| अतिरिक्त संचालक | | |
|---|---|---|
| दूरध्वनी क्रमांक (वै) –<br>कार्यालय दूरध्वनी क्र. – | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण भवन, राजाबहादूर मिल रोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११००१. फॅक्स नं. – ०२० – २६०५८७६६ / २६०५८२१८ / २६०५८१०९<br>Email ID : fwvigilance@gmail.com |
| आरोग्य सेवा<br>परिपत्रक | | अ.शा.पत्र.क्र.राकुकका/दक्षता/परिपत्रक/२९८५०/२०१४<br>दिनांक :- ०२ जून, २०१४ |


प्रति
१) जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, ...... (सर्व)

२) जिल्हा शल्यचिकित्सक,
जिल्हा रुग्णालय, .... (सर्व)

३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
महानगरपालीका, ..... (सर्व)

४) विशेष आरोग्य अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालीका, एफ साऊथ वार्ड, मुंबई

**विषय : कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया –
बिनटाका शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित करण्याबाबत मार्गदर्शक सूचना..**

राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया जास्तीत जास्त यशस्वी होण्याच्या दृष्टीने आरोग्य सेवा संचालनालय तसेच या कार्यालयामार्फत वेळोवेळी मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापी असे निदर्शनास आले आहे की, या मार्गदर्शक सुचनांची प्रत्यक्षात काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत नाही. परिणामी गुंतागुंत व इतर घटना घडल्याचे दिसून येते. अशा घटनांमुळे संपर्ण कार्यक्रमावर विपरीत परिणाम होतो. शिवाय समाजात असंतोष पसरतो.हे टाळण्यासाठी आणि या कार्यक्रमाची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्यासाठी पुन्हा एकदा पुढीलप्रमाणे महत्वाच्या मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

१) बिनटाका शस्त्रक्रियांच्या बाबतीत एका दिवशी एका सर्जनने २५ पेक्षा जास्त शस्त्रक्रिया करु नयेत. लाभार्थींची संख्या जास्त असल्यास त्याप्रमाणात सर्जन उपलब्ध असावेत अथवा दुसऱ्या दिवशी देखील शिबिर चालू ठेवावे.

२) शिबिराचे आयोजन करताना जिल्ह्यातील सर्जनची उपलब्धता लक्षात घ्यावी. याकरीता जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय यांनी एकत्रितपणे नियोजन करुन दोघांच्या स्वाक्षरीने शिबिराच्या आयोजनाचे आदेश निर्गमित करावेत.

३) या शिबिरामध्ये भूलतज्ञ उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी.

४) बिनटाक्याची शस्त्रक्रिया शिबिराकरीता दुसऱ्या जिल्ह्यातील परंतू त्याच मंडळातील सर्जनची नियुक्ती करावयाची झाल्यास संबंधित जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय यांच्याशी समन्वय साधून सर्जनची नियुक्ती करावी. यासाठी उपसंचालक, मंडळ यांची मान्यता घ्यावी.

५) तसेच अशा शिबिरांसाठी दुसऱ्या परिमंडळातील सर्जनची नियुक्ती करणे आवश्यक असल्यास त्यासाठी संबंधित मंडळाचे उपसंचालक, आरोग्य सेवा, संबंधित जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी / जिल्हा शल्यचिकित्सक यांचे पूर्वपरवानगीने सर्जनची नियुक्ती करावी. त्यानुसारच शिबिराचे आयोजन करावे.

६) शासन निर्णय क्रमांक कुनियो-२०१३/प्र.क्र.७४/कु.क., दिनांक ९.५.२०१३ अन्वये कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या सर्जन यांच्या पात्रतेचे निकष नमूद करण्यात आले आहेत, त्यानुसार कार्यवाही करावी.

७) मा. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे दिनांक १३/१०/२००९ रोजीच्या पत्रानुसार IPHS प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि इतर प्राथमिक आरोग्य केंद्रे येथे बिनटाका शस्त्रक्रिया करण्यास जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांनी परवानगी देण्यापूर्वी सदर केंद्रे त्यासाठी योग्य आहेत किंवा कसे याकरीता एकत्रितपणे भेट द्यावी व जिल्हा गुणवत्ता अभिवचन समितीच्या स्तरावर निर्णय घेण्यात यावा.

सबब यापुर्वी उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रकांनुसार वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. जिल्हा गुणवत्ता अभिवचन समितीची बैठक नियमितपणे घेऊन यामध्ये वरील सुचनांचे काटेकोर पालन केले जाईल याकरीता आवश्यक ती कार्यवाही करावी.

Dhanande

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,
राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे

प्रत योग्य त्या कार्यवाहीकरीता
उपसंचालक, आरोग्य सेवा, प्रभारी मंडळ, .... (सर्व)

२/- यांना देऊन कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये बिनटाका शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करताना वरील मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्याबाबत मंडळ स्तरावरील बैठकांमध्ये नियमित आढावा घेण्यात यावा.

प्रत माहितीकरीता
मा. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
मा. आयुक्त (कुटुंब कल्याण) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई